<u>**अतारांकित प्रश्नोत्तरांची चौथी यादी**</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेला आर्थिक सहाय्य करणेबाबत**

**(१) ६१५१ (१७-०४-२०१५). श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँक अडचणीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेला आर्थिक सहाय्य करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१०-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस आर्थिक मदत करण्यासंदर्भात मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१/१२/२०१४ व दिनांक १/१२/२०१५ रोजी बैठका संपन्न झाल्या. या बैठकीमध्ये बँकेच्या आर्थिक अडचणीबाबत चर्चा झाली.

ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाचा मार्च, २०१७ अखेर CRAR ९% पेक्षा कमी असेल, केवळ अशा बँकांना CRAR ची पूर्तता करण्यासाठी संभाव्य आर्थिक सहाय्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आदिवासी विकास भागात झालेल्या गैरव्यवहारासंदर्भात श्वेतपत्रिका काढण्याबाबत**

**(२) ६२४३ (१७-०४-२०१५). श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विकास भागात झालेल्या गैरव्यवहारासंदर्भात श्वेतपत्रिका काढण्यासाठी मा.लोकप्रतिनिधी यांनी संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी श्वेतपत्रिका काढण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्वेतपत्रिका काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

मा.लोकप्रतिनिधी यांनी श्वेतपत्रिकेबाबत केलेली मागणी या विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे नागापूर (ता.परळी, जि.बीड) येथील ऊसतोड मजुर मुलांच्या वसतिगृहाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३) ६२७५ (२१-०४-२०१५). श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नागापूर (ता.परळी, जि.बीड) येथे ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी बांधण्यात आलेल्या वसतिगृह इमारतीची पडझड होऊन दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी शासनाने बांधलेल्या वसतिगृह इमारतीचा वापर अद्याप सुरु झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी बांधण्यात आलेल्या वसतिगृह इमारतीचा वापर सुरू होण्यास झालेल्या विलंबाची कारणे कोणती,

(४) नसल्यास, सदर वसतिगृहात सध्या किती विद्यार्थी शिकत आहेत, यावर शासनाने किती खर्च केलेला आहे,

(५) वसतिगृह इमारतीची दुरुस्ती करून त्याच्या वापरासाठी कोणत्या उपाययोजना शासन करणार आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-०२-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे

(३), (४) व (५) निधी अभावी वसतिगृहाचे बांधकाम कंत्राटदाराने पूर्ण न केल्याने वसतिगृह शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत झालेले नाही.

---

**चिकणी विविध कार्यकारी (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) सोसायटीच्या सचिवाने गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४) ७८६८ (०३-०८-२०१५). श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकणी विविध कार्यकारी (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) सोसायटीमध्ये श्रीमती जयंवताबाई गणपत राठोड या महिलेच्या नावावर सोसायटीच्या सचिवांने २०११ मध्ये ५६ हजार ८०० रुपयांचे कर्ज मंजूर करुन गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यांत आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही. दारव्हा तालुक्यातील चिकणी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या सचिवाने श्रीमती जयवंताबाई गणपत राठोड यांना नियमानुसार कर्ज मंजूर केले असल्याबाबत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दारव्हा यांनी कळविले आहे.

(२) होय.

यासंदर्भात दिनांक १३/०५/२०१५ रोजीच्या वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांनी दिनांक १३/०५/२०१५ च्या पत्रान्वये सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता.दारव्हा तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, यवतमाळ यांना चौकशी करण्यास कळविले होते. या अनुषंगाने उपसरव्यवस्थापक, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक विभागीय कार्यालय, दारव्हा यांचेमार्फत सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

(३) चौकशी अहवालानुसार श्रीमती जयवंताबाई गणपत राठोड यांना नियमानुसार रुपये ५६८००/- इतके कर्ज मंजूर केल्याचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता.दारव्हा यांनी कळविले आहे तसेच श्रीमती राठोड यांनी दिनांक २५/०५/२०११ रोजी कर्जाची उचल केली आहे. तसेच याबाबत त्यांनी दिनांक १६/११/२०१५ रोजी प्रतिज्ञापत्रही दिले आहे. सदरची कार्यवाही नियमानुसार झालेली असल्याने संबंधितांविरुध्द कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा रुग्णालयामध्ये मातामृत्यू / बालमृत्यू रोखण्यासाठी नवीन १२ विभाग कार्यरत करण्याबाबत

**(५) १४१२० (२२-१२-२०१६). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा रुग्णालयामध्ये मातामृत्यू व बालमृत्यू रोखण्यासाठी उभारलेल्या ३५ विभागांमुळे ८ हजार बालकांना जीवदान मिळाले असून त्यात आणखी १२ विभाग नव्याने तयार करण्यात येणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे १२ विभाग कार्यरत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-०१-२०१७) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. राज्यामध्ये गंभीर आजारी नवजात बालकांवर उपचार करण्यासाठी २३ जिल्हा रुग्णालयात, ९ स्त्री रुग्णालयात व ४ उपजिल्हा रुग्णालयात एकूण ३६ विशेष नवजात काळजी कक्षांची स्थापना करण्यात आलेली आहे. या कक्षामध्ये सेप्सिस, न्युमोनिया, कमी वजन व अपुऱ्या दिवसाच्या बालकांवर तसेच श्वासावरोधाने व गंभीर जंतूसंसर्गाने ग्रस्त व इतर आजार असलेल्या नवजात शिशुंवर उपचार करुन काळजी घेतली जाते. १ एप्रिल ते ३१ जुलै, २०१५ या कालावधीत नवजात काळजी कक्षात एकूण १७,०४३ बालकांना दाखल करण्यात येवून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. सदर ३६ विशेष नवजात काळजी कक्षापैकी १२ कक्षांचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे.

(२) १२ संस्थामधील कक्षाचे विस्तारीकरण करण्यासाठी निकषाप्रमाणे इमारत बांधकाम, आवश्यक यंत्र सामुग्री, वैद्यकीय उपकरणांची खरेदी व मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ सधन सिंचन कार्यक्रमांतर्गत निविदा काढण्यास विलंब झाल्याबाबत**

**(६) १५१४३ (०२-०५-२०१६). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ सधन सिंचन कार्यक्रमांतर्गत फक्त रूपये १.५० कोटीची निविदा काढण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित कामांच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान असूनही कार्यकारी अभियंता, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून निविदा काढण्यास विलंब करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३२ कामांची निविदा नस्ती तयार असूनही निविदा काढण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार निविदा तात्काळ काढून काम पूर्णत्वास नेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (२०-०१-२०१७) :** (१) नाही.

सन २०१२-२०१३ ते जून, २०१६ पावेतो विदर्भ संघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत विदर्भातील सर्व लघु सिंचन जिल्हा परिषद विभागामार्फत रुपये १५१.६१ कोटी किंमतीच्या १,९९१ योजनांच्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) नाही.

निधी उपलब्ध नसल्यामुळे प्रलंबित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकिय रुग्णालयांमध्ये औषधांचा नवीन दर करार लागू करण्याबाबत**

**(७) १८६६२ (०२-०५-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकिय रुग्णालयांमध्ये रुग्णांना औषधे शासनस्तरावर देण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औषधी देण्याच्या दर कराराची मुदत केव्हा संपली, दर कराराची मुदत संपल्याने रुग्णसेवेवर त्याचा परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, नवीन दर करार करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांसाठी औषधांची खरेदी संख्या करारावर करण्यात येते.

---

**रायगड जिल्हयातील घरकुल योजनेचा निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(८) १९३२४ (१६-०८-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील दारिद्र्यरेषेखालील मागासवर्गीय समाजासाठी घरे बांधण्यासाठी घरकुल योजनेंतर्गत सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात निधी पुरविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घरकुल योजनेंतर्गत अनुसूचित जमाती (एस.टी) च्या घरकुलांना पूर्णत: मंजूरी मिळूनही निधी अखर्चित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अखर्चित राहिलेला निधी अन्य दारिद्र्यरेषेखालील मागासवर्गीय समाजातील नागरिकांच्या घरकुल योजनेसाठी खर्च करण्यात यावा अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०२-२०१७) :** (१) रायगड जिल्ह्यासाठी सन २०१५-१६ करीता शबरी आदिवासी घरकुल, पारधी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुल योजना व आदिम जमाती करीता घरकुल योजनेकरीता अनुक्रमे लक्षांक २०६, २ व १५६ प्राप्त आहे.
सन २०१५-१६ पासून सदर घरकुलांचा निधी राज्य व्यवस्थापन कक्ष गृहनिर्माण, बेलापूर, मुंबई यांचेकडे वर्ग केला असून जिल्हास्तरावर लाभार्थी मंजुरीची प्रक्रिया सुरु आहे.
(२) अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे अंतर्गत प्रकल्प अधिकारी पेण यांनी त्यांचे पत्र क्र.जा.क्र. घरकुल-२०१६/का-३/३४९९, दिनांक २२/७/२०१६ अन्वये रायगड जिल्हयातील सर्व पंचायत समिती कार्यालयांना सन २०१५-१६ करीता लाभार्थ्यांच्या घरकुलांचे सर्वेक्षण करुन गावनिहाय लाभार्थी यादी सादर करणेबाबत कळविले आहे.

(३) आदिवासी विभागामार्फत राबविण्यात येणारी घरकुल योजना ही अनुसूचित जमाती साठीच असल्याने सदर घरकुलाचा निधी बिगर आदिवासी समाजासाठी खर्च करता येणार नाही. तसेच अशा प्रकारचे निवेदन आदिवासी विकास विभागाकडे प्राप्त झालेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरखाडी, डोंगरी (मुंबई) येथील उद्‌यानासाठी राखीव**
**असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(९) १९५५९ (१९-०८-२०१६). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखाडी, डोंगरी (मुंबई) येथील ॲड.आनंदराव सुर्वे रस्त्यावर उद्‌यानासाठी राखीव असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम करुन हॅन्झ हाऊस नावाची एकमजली इमारत उभारण्यात आली असल्याची बाब माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अनधिकृत बांधकामाबाबत स्थानिक नागरिकांनी लेखी निवेदनाद्‌वारे महानगरपालिकेला कळवूनही महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१७) :** (१) होय. सदर बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आली.
(२) याबाबत अखिल डोंगरी जनजागृती कृती समितीने महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयात तक्रार केली आहे. सदर अनधिकृत बांधकामावर महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये संबंधितांवर स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र शासनाने घोषित केलेल्या प्रधानमंत्री पीक योजनेच्या**
**मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजना राबविण्याबाबत**

**(१०) १९६७९ (१२-०८-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १९६०६ ला दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, गारपीट इ. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना आधार मिळावा यानुषंगाने सन २०१६-१७ पासुन केंद्र शासनाने घोषित केलेल्या प्रधानमंत्री पीक योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजना राबविण्याचा शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत विमा योजनेच्या अंमलबजावणीचे अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१७-०१-२०१७) :** (१) होय.

(२) प्रधानमंत्री पीक विमा योजना राज्यात खरीप हंगाम २०१६ पासून क्षेत्र हा घटक धरुन राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम २०१६ मध्ये योजना राबविणेस्तव दिनांक ५ जुलै, २०१६ व दिनांक १६ जुलै, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच, रब्बी हंगाम २०१६-१७ मध्ये योजना राबविणेस्त दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील डोंगरांना वणवे लागल्याने वनसंपत्ती**
**व प्राणी पशुपक्षी यांना धोका निर्माण झाल्याबाबत**

**(११) १९७३४ (११-०८-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात डोंगराळ भागात अनेक ठिकाणी वणवे लागत असल्यामुळे वनसंपत्ती, गवत जळून नष्ट होत असून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वणव्यांमुळे जंगलात आढळणारे प्राणी-पशुपक्षीच्या जाती नष्ट होण्याची संभावणा निर्माण झाली असून या वणव्यामुळे वरकस भागात लागवड केलेल्या आंबा, काजू आदी फळबागांची व शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने वणव्यामुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच डोंगरांना वणवे लागू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०१-२०१७) :** (१) रायगड जिल्ह्यातील वनक्षेत्रात काही ठिकाणी वणवे लागत असल्यामुळे काही प्रमाणात गवत जळून नष्ट होत आहे. हे खरे आहे. परंतू त्यामुळे जनावरांच्या चाऱ्यांचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) जंगलातील डोंगर भागात लागलेल्या आगीला प्रतिबंधक उपाययोजना खालीलप्रमाणे करण्यात येतात :-

१) वनक्षेत्राभोवती जाळरेषा घेणे.

२) वनक्षेत्रातील रस्त्याच्या दुतर्फा आग प्रतिबंधक जाळरेषा काढणे.

३) वणवा लागू नये म्हणून लोकांमध्ये जनजागृती करणेसाठी भित्तीपत्रके छापून ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय इ. सार्वजनिक ठिकाणी लावून प्रसिध्दी करणे.

४) गावामध्ये लोकांच्या सभा घेऊन लोकांना वनामध्ये आगी लावू नये म्हणून महत्व पटवून देणे.

५) वनविकास समितीच्या माध्यमातून स्थानिक लोकांना वनवणव्यातून होणाऱ्या नुकसानीबाबत अवगत करणे.

६) वॉच टॉवरच्या माध्यमातून लक्ष ठेवणे.

७) अग्निप्रतिबंधक पंधरवडा ६ मार्च ते २१ मार्च या कालावधीत साजरा करुन वनपरिक्षेत्र पातळीवर जनजागृती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर शासकीय रुग्णालयाची खाजगी कंपनीने तोडफोड केल्याबाबत**

**(१२) १९८१७ (११-०८-२०१६). श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शासकीय रुग्णालयातील रेडिओलॉजी इमेजिंग डायग्नोस्टिक सेंटर पब्लिक प्राईव्हेट पार्टनरशिप (पी.पी.पी.) अंतर्गत खाजगी कंपनीस चालविण्यास शासनाने परवानगी दिल्याने व सदर कंपन्यांनी मुदतीत काम पूर्ण न केल्याने कंपनीशी केलेला करार रद्द केल्याचे माहे मे, २०१६ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राट रद्द झाल्यामुळे सदर कंपनीने रुग्णालयाची तोडफोड केली असून शासकीय रुग्णालयाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.

राज्यातील निवडक २२ रुग्णालयांमध्ये सार्वजनिक खाजगी भागिदारी (पीपीपी) तत्वावर रेडिओलॉजी इमेजिंग डायग्नॉस्टिक सेंटर सुरु करण्याच्या दृष्टीने मे.विप्रो जी.ई.हेल्थ केअर प्रा.लि. यांच्यासमवेत दिनांक २०/१२/२०१२ रोजी करार करण्यात आला होता. सदरहू २२ रुग्णालयांमध्ये मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर या रुग्णालयाचा देखील समावेश होता. तथापि, अडीच वर्षाच्या कालावधीत सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत या कंपनीकडून कार्यवाही न झाल्यामुळे दिनांक २०/१२/२०१२ रोजी करण्यात आलेला सदरचा करार नोव्हेंबर, २०१५ मध्ये रद्द करण्यात आला आहे.

(२) व (३) रेडिओलॉजी इमेजिंग डायग्नॉस्टिक सेंटर सुरु करण्याच्या दृष्टीने मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर येथील तळ मजल्यावरील बांधकामात मे.विप्रो जी.ई.हेल्थ केअर प्रा.लि.

यांनी अंतर्गत फेरफार केला होता. तळ मजल्यावरील प्लॅस्टर, फ्लोरींग, इत्यादी कामे करण्याकरीता उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उल्हासनगर यांच्याकडून खर्चाचे अंदाजपत्रक मागविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी-हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर करण्याबाबत**

**(१३) १९८७२ (१२-०८-२०१६). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी-हिंगोली जिल्हयात दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून या दुष्काळग्रस्त भागात शासनाने केलेल्या चुकीच्या प्रक्रियेमुळे तसेच, दुष्काळाची सत्यस्थितीची नोंद न घेतल्यामुळे शेतकऱ्यांना पीक विमा उपलब्ध होऊ शकला नसल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांच्याकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पीक विम्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१७-०१-२०१७) :** (१) होय.
(२) राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत निश्चित करण्यात येणारी नुकसान भरपाई ही केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या पध्दतीने पीक कापणी प्रयोगांद्वारे प्राप्त सरासरी उत्पन्नाचे आधारेच निश्चित केली जाते. शासनाने जाहीर केलेल्या इतर कोणत्याही निकषांचे पीक पैसेवारी, टंचाईसदृष्य परिस्थिती, पूर इत्यादीच्या आधारे नुकसान भरपाई निश्चित केली जात नाही.

खरीप हंगाम २०१५ ची नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पीक कापणी प्रयोगाच्या आधारे निश्चित करण्यात आलेली आहे.

योजनेच्या तरतुदीप्रमाणे खरीप हंगाम २०१५ मध्ये परभणी व हिंगोली जिल्हयामध्ये योजनेंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करण्यासाठी पीक कापणी प्रयोग क्षेत्रिय यंत्रणेमार्फत राबविण्यात आलेले आहेत. सदर पीक कापणी प्रयोगाच्या आधारे आलेले सरासरी उत्पन्न व उंबरठा उत्पन्न यांच्या आधारे नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये परभणी जिल्हयातील ५.८९ लाख सहभागी शेतकऱ्यांपैकी ५.८७ लाख शेतकऱ्यांना रुपये ४८८.६५ कोटी व हिंगोली जिल्हयातील २.५८ लाख सहभागी शेतकऱ्यांपैकी २.३४ लाख शेतकऱ्यांना रुपये ११४.६८ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नव्या राष्ट्रीय पेन्शन योजनेतील अतिरिक्त कपातीमुळे पडणारा आर्थिक ताण**

**(१४) १९९३८ (११-०८-२०१६). श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव्या राष्ट्रीय पेन्शन योजनेतील अतिरिक्त कपातीमुळे शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यावर आर्थिक ताण पडत असल्याच्या तक्रारी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांना या पेन्शन योजनेत हप्ते भरण्यासाठी शासनाने कोणती सवलत दिली वा देण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-१२-२०१६) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सार्वजनिक आरोग्य विभागाला अनुशेष निर्मुलनासाठी मिळालेल्या निधीतील निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(१५) २०१२३ (२०-०८-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या चार-पाच वर्षात सार्वजनिक आरोग्य विभागाला अनुशेष निर्मुलनासाठी मिळालेल्या निधीपैंकी पुरेसा निधी खर्च झाला नसल्याने या क्षेत्राचा सुमारे रूपये ३७८ कोटींचा अनुशेष शिल्लक असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा अनुशेष दूर करण्यासाठी दोन महिन्यात सविस्तर कार्यक्रम तयार करण्याचे निर्देश मा.राज्यपाल यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यक्रम तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०१-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे. माहे मार्च, २०१६ अखेर रुपये १७४.२३ कोटी आर्थिक अनुशेष शिल्लक आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कृती आराखडा तयार करण्यात आला असून पुढील ३ वर्षात अनुशेष भरुन काढण्यात येईल. सन २०१६-१७ मध्ये रुपये १४१०० लाख तरतूद करण्यात आली आहे.

---

**दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी डिझेल व पेट्रोलवर दुष्काळ कर लावल्याबाबत**

**(१६) २०१६८ (२०-०८-२०१६). श्री.प्रकाश गजभिये, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी डिझेल व पेट्रोलवर २ रुपये प्रतिलिटर दुष्काळ कराद्वारे रुपये १३३७ करोड जमा केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०१५ ते माहे मार्च, २०१६ या कालावधीत जनतेकडून कराद्वारे वसूल केलेल्या निधीचा उपयोग शासनाने कोणकोणत्या प्रयोजनासाठी केला आहे, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०१-२०१७) :** (१) माहे ऑक्टोबर, २०१५ ते मार्च, २०१६ कालावधीमध्ये डिझेल व पेट्रोलवर आकारलेल्या रुपये २ प्रतिलिटर कराद्वारे रुपये ११२८ कोटी जमा झाले आहेत.
(२) सन २०१५-१६ वर्षाकरिता

१) राज्यातील खरीप हंगामात पडलेल्या दुष्काळामुळे नुकसान शेतीपीकांकरिता शेतकऱ्यांना मदत वाटप करण्याकरिता एकूण रुपये ३,१११.१७ कोटी निधी वितरित करण्यात आला.
२) राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे शेतीपीकांच्या नुकसानीकरिता शेतकऱ्यांना एकूण रुपये ७४०.७५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला.
३) राज्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी एकूण रुपये ७३.०१ कोटी निधी, चारा छावण्या सुरु करण्याकरिता वितरीत करण्यात आला.

(३) लागू नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील मार्कंडेय सहकारी रुग्णालयात गोरगरीबांसाठी असलेली राजीव गांधी योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(१७) २०२९९ (१९-०८-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मार्कंडेय सहकारी रुग्णालय (जि.सोलापूर) येथे राजीव गांधी योजनेतून आतापर्यंत १२०० शस्त्रक्रिया यशस्वी केल्या असून हृदयशस्त्रक्रियेसाठी ४९ जणांना बोलाविले. परंतु अचानक राजीव गांधी योजनेतून मार्कंडेय रुग्णालयाला वगळल्यामुळे सदर रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय झाल्याचे दिनांक २२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णालयात गोरगरीबांसाठी असलेली राजीव गांधी योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०१-२०१७) :** (१) होय.

सदर रुग्णालयाविरुध्द प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने दिनांक १७ मे, २०१६ रोजी झालेल्या ६६ व्या रुग्णालय अंगीकरण समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार दिनांक २२ मे, २०१६ रोजी सदर रुग्णालयाचे अंगीकरण रद्द करण्यात आले आहे.

(२) दिनांक १७ जून, २०१६ रोजीच्या ६७ व्या रुग्णालय अंगीकरण समितीच्या बैठकीमध्ये सदर रुग्णालयास C२ श्रेणीमध्ये २३ विशेषज्ञ सेवांसाठी योजनेंतर्गत अंगीकृत करण्यास मान्यता दिली आहे. रुग्णालयाकडून पुढील दस्तऐवज सादर करणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१८) २०३१८ (२०-०८-२०१६). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तज्ञ डॉक्टरांची ५५१ पदे मंजूर आहेत, त्यापैकी तब्बल ३८३ पदे रिक्त आहेत. मनोविकारतज्ञांची एकूण ८९ पदे मंजूर असतानाही त्यापैकी संपूर्ण राज्यासाठी फक्त २० मनोविकार तज्ञ असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन डॉक्टर, तंत्रज्ञ, कर्मचारी यांच्या रिक्त पदांचा आढावा घेऊन सदर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-०१-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे. तज्ञ डॉक्टरांची ५५१ पदे मंजूर असुन त्यापैकी ३८९ पदे रिक्त आहेत.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील पदे मनोविकारतज्ञांच्या पदांसह भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच, तंत्रज्ञ व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही आरोग्य सेवा संचालनालयाच्या स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) २०३२३ (२०-०८-२०१६). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अर्धवट स्थितीत सुरु असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये ९० हजार कोटींची आवश्यकता आहे व जलसंधारण विभागास यासाठी केवळ रुपये सात ते आठ हजार कोटीचा निधी उपलब्ध झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अर्धवट स्थितीत असलेले प्रकल्प कोण-कोणत्या विभागातील आहेत व ते पूर्ण झाल्यास किती सिंचन क्षमता वाढणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त अर्धवट स्थितीत असलेले सिंचन प्रकल्प लवकर पूर्ण होऊन त्याचा राज्यातील जनतेला लाभ व्हावा यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे व त्याचा कालावधी काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील ३७६ बांधकामाधीन सिंचन प्रकल्पाची १ एप्रिल, २०१६ ची संभाव्य उर्वरित किंमत सुमारे रुपये ८४४०० कोटी आहे. सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात जलसंपदा खात्यासाठी रुपये ७८०७ कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करुन दिला आहे.

(२) उक्त बांधकामाधीन सिंचन प्रकल्प राज्यातील सर्व विभागामधील आहेत. सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सुमारे ३२.२१ लक्ष सिंचन क्षमता वाढणार आहे.

(३) राज्यातील बांधकामाधीन सिंचन प्रकल्प पूर्ण करणेसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करणेचे प्रयत्न करणेत येत आहेत. या अंतर्गत केंद्र शासनाकडून निधी मिळविणेसाठी प्रयत्न करणेत येत आहेत.

प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना-वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रातील २६ मोठ्या व मध्यम प्रकल्पांच्या किंमतीएवढा निधी केंद्र शासनाच्या माध्यमातून मिळणार आहे. या २६ प्रकल्पांना रुपये ३८३० कोटी एवढे केंद्रीय अर्थसहाय्य पुढील ३ वर्षात मिळणार आहे. या व्यतिरिक्त राज्य हिश्याची रक्कम रुपये १२७७३ कोटी नाबार्ड मार्फत दिर्घ मुदतीचे (१५ वर्षे) व कमी व्याज दराचे (६ % दर) कर्ज रुपाने प्राप्त होणार आहे.

या व्यतिरिक्त राज्यातील आत्महत्याग्रस्त भागातील १०७ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये ७१८७ कोटी व दुष्काळी भागातील ७ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये ३५०० कोटी एवढ्या रकमेचा विशेष पॅकेज स्वरुपात निधीची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे.

---

### राज्यातील शासकीय रुग्णालयांतील औषधांचा दर्जा सुधारण्याबाबत

**(२०) २०३६४ (२०-०८-२०१६). श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांतील औषधांचा रुग्णांना गुण येत नसल्याने सदर औषधांच्या गुणवत्तेबाबत शंका निर्माण झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करार पध्दतीने शासकीय औषधांची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात असून पुरवठा करणाऱ्या कंपन्या खाजगी प्रयोगशाळातून ही औषधे तपासून घेत असल्याने औषधांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे औषध क्षेत्रातील तज्ज्ञांनी मत व्यक्त केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासकीय रुग्णालयातील औषधांचा दर्जा सुधारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०१-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

आरोग्य सेवा संचालनालयाच्या अखत्यारितील आरोग्य संस्थांसाठी पुरवठा करण्यात येणाऱ्या औषधांची गुणवत्ता तपासणी एनएबीएल (नॅशनल अॅक्रेडीशन बोर्ड फॉर टेस्टींग अॅण्ड कॅलिब्रेटींग लॅबरोटरीज) कडून मान्यता प्राप्त प्रयोगशाळा मार्फत करण्यात येते. सदरहू तपासणी अहवाल समाधानकारक आल्यानंतरच औषधांच्या वितरणास परवानगी देण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामविकास विभागांतर्गत गावातील नव्या रस्त्याची बांधणी आणि जुन्यांची डागडुजी निधी अभावी खोळंबल्याबाबत**

**(२१) २०७०४ (१८-०८-२०१६). श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामविकास विभागांतर्गत गावातील नव्या रस्त्याची बांधणी आणि जुन्यांची डागडुजी निधी अभावी खोळंबल्याने राज्यभरातील गावे अस्वच्छ झाली असून स्वच्छ भारत अभियानाला खीळ बसल्याचे चित्र माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यभरातील गावखेडयातील रस्त्याची कामे २५/१५ या लेखा शिर्षकाखाली करण्यात येतात राज्यभरातील आमदारांनी कामासाठी दिलेल्या पत्रांची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गावातील नव्या रस्त्यांची बांधणी आणि जुन्यांची डागडुजीसाठी देण्यात येणारा निधी वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध निधी व कामाची निकड विचारात घेऊन शासनाकडे लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार प्राप्त प्रस्तावांतील कामांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये रुपये ६४७९५.१२ लक्ष निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर मंजूर निधीपैकी २०% प्रमाणे संबंधित यंत्रणांना निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात फळे व भाजीपाला विक्री केंद्र सुरु करण्याबाबत**

**(२२) २१२२९ (१९-०८-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिल्लीच्या धर्तीवर शेतकऱ्यांना फायदेशीर ठरलेली राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाची फळे व भाजीपाला विक्री केंद्रे सुरु करण्याबाबत सामंजस्य करार करण्याचे मा.सहकार मंत्री यांनी जाहिर केल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना थेट लाभ देणारी ही योजना राज्यात कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०१-२०१७) :** (१) होय.

(२) मंत्री (पणन) यांनी दिनांक १६ एप्रिल, २०१६ रोजी दिल्ली येथे नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाने (एन.डी.डी.बी.) सुरु केलेल्या 'सफल' च्या वितरण केंद्राला भेट देवून दिल्ली शहरात ताजी फळे व भाजीपाला वितरण व्यवस्थेची पाहणी केली आहे. या पाहणीनंतर एन.डी.डी.बी.ला दिनांक १८/०६/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे राज्यातील पणन विभागाशी संबंधित माहिती देऊन त्यांच्या मदतीने राज्यात प्रकल्प सुरु करण्यासाठी मार्गदर्शन करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील डॉक्टरचे व कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत**

**(२३) २१३७६ (२३-०८-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे ७५८ रिक्त पदाचा प्रस्ताव शासनाकडे गेल्या वर्षभरापासून प्रलंबित असल्याचे दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील डॉक्टरचे व कर्मचाऱ्यांचे रिक्त पदे भरण्यासाठी सदर प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-१२-२०१६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. तथापि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे डी.एम. व एम.सी.एच. अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात शासन आदेश दिनांक ०२/०६/२०१६ अन्वये वर्ग-१ ते वर्ग-३ मधील नियमित १०० पदे व वर्ग-३ व वर्ग-४ ची ३५ पदे (बाह्ययंत्रणेमार्फत कामे करुन घेणे) निर्माण करण्यात आली आहेत.

---

### ग्रामपंचायतींना स्वायत्ता देण्याकरीता विविध विकास कामांकरीता वाटप करण्यात येणारा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२४) २१४०५ (१८-०८-२०१६). श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनामार्फत ग्रामपंचायतींना स्वायत्ता देण्याकरीता विविध विकास कामांकरीता सरळमार्गे वाटप करण्यात येणारा निधी अखर्चित राहिल्यास या निधीचा गैरप्रकार होऊ नये याकरीता हा अखर्चित निधी शासनाकडे जमा करण्याचे आदेश निर्गमित झाल्याचे वृत्त दिनांक १६ मे, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांच्या मंजूरी, तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया जिल्हा परीषद यंत्रणेमार्फत होत असल्याने विलंब होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक विविध विकासात्मक कामांच्या निधी मंजूरी प्रक्रियेतील विलंबामुळे तसेच मंजूरी प्रक्रियेत आर्थिक वर्ष संपल्याने निधी परत जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :** (१) हे खरे आहे.

विविध योजनांचा निधी ज्या आर्थिक वर्षी प्राप्त झाला त्या आर्थिक वर्षात किंवा पुढील वर्षात खर्च करण्याची मान्यता असून ही दोन्ही आर्थिक वर्षे संपल्यावरही रक्कम अखर्चित राहिल्यास त्यास खर्च करण्याची परवानगी नसल्याने दिनांक १३ मे, २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये अखर्चित रकमा भरण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ६ जून, २००८ नुसार प्राप्त झालेला निधी पुढील आर्थिक वर्षामध्ये खर्च करण्याची परवानगी असल्याने निधी खर्च करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आयुष संचालनालयांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत

**(२५) २१५३१ (२३-०८-२०१६). श्री.नागो गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुष वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय पदवीधारक व पदव्युत्तर असताना वर्ग ३, अराजपत्रीत दर्जा असणे अतिशय अन्यायकारक असून प्रशासनात तंत्रज्ञ व परिचारिका वर्गाच्या कामाची देखरेख व नियंत्रण ठेवतांना अडचण येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहावा वेतन आयोगाप्रमाणे सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रथम प्रवेश वेतनश्रेणी १५,६००, ग्रेड पे ५४०० असताना, फक्त आयुष संचालनालयांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांना वेतनश्रेणीत आतासुद्धा ९३०० व ग्रेड पे ४४०० देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील सुमारे १०,००० वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदव्युत्तर पदवीधारकांना सहा वेतनवाढ व पदवीधारकांना तीन वेतनवाढ मिळत आहे, परंतु सदर वैद्यकीय अधिकारी यापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(४) राज्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी व अध्यापकांना ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता मिळत असून फक्त ४२ वैद्यकीय अधिकाऱ्यांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असतानाही ६ वे वेतन आयोग लागू होऊन ८ वर्षे झाली तरी ५ व्या वेतन आयोगानुसार देण्यात येत असूनही १५ वर्षांपासून अतिरिक्त कार्यभारावर अध्यापनाचे काम सुरू आहे तसेच अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे वैद्यकीय अधिकारी पदोन्नतीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०१-२०१७) :** (१) होय, शासन स्तरावर आयुर्वेद विस्तार अधिकारी यांना राजपत्रित दर्जा देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वित्त विभागाने सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदाचा ग्रेड पे रुपये ४४०० वाढ करुन रुपये ४६०० करण्यात आला आहे.
(३) होय. असा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १४/१२/२०११ रोजी निर्गमित केला आहे.
(४) सहाव्या वेतन आयोगामध्ये अतिरिक्त वेतनवाढी देण्याबाबत कोणतेही नियम केलेले नाहीत. यास्तव, पदव्युत्तर पदवीधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांना ६ अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पारशिवनी (जि.नागपूर) तालुक्यात कृषी विभागाच्या माध्यमातून माती परिक्षण केंद्र व शेतकऱ्यांना आधुनिक शेती प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत

**(२६) २१७२७ (१२-०८-२०१६). श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारशिवनी (जि.नागपूर) तालुक्यात कृषी विभागाच्या माध्यमातून माती परिक्षण केंद्र व शेतकऱ्यांना आधुनिक शेती प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याची मागणी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१७-०१-२०१७) :** (१) एप्रिल, २०१६ मध्ये अशा आशयाचे पत्र प्राप्त झाले आहे.
(२) शेतकऱ्यांना आधुनिक शेती प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत शासन स्तरावर कोणतेही धोरण नाही.

नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक उपविभागात मृद चाचणी प्रयोगशाळा स्थापन्याचा जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून करण्याबाबत कृषी समितीच्या सभेत प्रस्तावित केले होते. त्यानुषंगाने प्रत्येक उपविभागस्तरावर मृद चाचणी प्रयोगशाळा स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीपुढे सादर करण्यात आला आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नंदूरबार नगरपरिषदेने आयएचएसडीपी योजनेंतर्गत बांधलेल्या घरांमध्ये बेकायदेशीरपणे घुसखोरी करणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(२७) २१७२८ (२४-०८-२०१६). श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार नगरपरिषदेने आयएचएसडीपी योजनेंतर्गत बांधलेल्या घरात काहींनी बेकायदेशीरपणे घुसखोरी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून बेकायदेशीरपणे घुसखोरी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१६) :** (१) होय.

(२) जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेसह संबंधितांची दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ रोजी जिल्हास्तरावर बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत बेकायदेशीर ताबा घेतलेल्या अपात्र लाभार्थ्यांकडून घरकुले खाली करण्याबाबत कार्यवाहीकरीता सूचना देण्यात आल्या आहेत.

अपात्र लाभार्थ्यांकडून घरकुले रिकामी करुन घेण्याची कार्यवाही दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, नंदूरबार यांना दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत कॅशलेस**
**विमा योजनेच्या सेवेमध्ये उणीवा असल्याबाबत**

**(२८) २१८६१ (२०-०८-२०१६). श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत दुर्बल घटकांसाठी राबवल्या जाणाऱ्या कॅशलेस विमा योजनेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या सेवेमध्ये अनेक उणीवा असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णाच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या उपकरणांचा वापर करणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०१-२०१७) :** (१) व (२) नाही.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत माहे सप्टेंबर, २०१६ अखेर एकुण १०.१२ लाख शस्त्रक्रिया/उपचार झालेले आहेत. लाभार्थी शिधापत्रिका व वैध ओळखपत्राच्या आधारे योजनेच्या अंगीकृत सरकारी तसेच खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेऊ शकतात. योजनेच्या नियमाप्रमाणे रुग्ण एखादया उपचारास पात्र असल्यास, त्यास या योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयामध्ये मोफत उपचार दिले जातात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये ५० टक्केपेक्षा कमी आणेवारी असलेली गावांना दुष्काळी सवलती देण्याबाबत**

**(२९) २१९५० (१९-०८-२०१६). श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये ५० टक्केपेक्षा कमी आणेवारी असलेली गावे शासनाने जाहिर केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळी गावांना व ५० टक्के पेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांना कोणकोणत्या सवलती शासनाने दिल्या आहेत,

(३) असल्यास, या सर्व दुष्काळग्रस्त गावांना वीज बिल माफ सवलत जाहिर केले असून सदर गावाना त्या सवलती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महसूल व वन विभाग दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये खालील उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

१) जमीन महसूलात सुट
२) कृषी पंपाच्या चालू वीज देयकात ३३.५% इतकी सुट
३) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी
४) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर
५) दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(३) दुष्काळ जाहीर केल्यानंतर राज्य शासनाकडून दुष्काळग्रस्त गावांसाठी/शेतकऱ्यांसाठी द्यावयाच्या सोयी-सवलती या दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे कृषी पंपाच्या चालू वीज देयकात ३३.५% इतकी सूट व दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे ह्या उपाययोजना जाहिर करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कामगार विमा रुग्णालये शासनाने चालविण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३०) २२००८ (२०-०८-२०१६). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४९३२ ला दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुरु असलेल्या राज्य कामगार विमा योजनेच्या तेरा रुग्णालयांची दूरवस्था झाल्याने कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २३८० खाटा असलेली १३ कामगार विमा रुग्णालये राज्य शासनाने चालवावीत असा प्रस्ताव आरोग्य खात्याने केल्याचे दिनांक १ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणत्या खात्याकडे सदर प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबित आहे, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्य कामगार योजना ही राज्य कामगार विमा महामंडळ यांच्यामार्फत राबविली जाते. सन २०१० मध्ये संपुर्ण राकावि योजना महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याबाबत मा.राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता. मात्र राकावि योजनेच्या हस्तांतरणाची कार्यवाही प्रलंबित होती. त्यामुळे नविन धोरणात्मक निर्णय न झाल्याने तसेच निधी उपलब्ध होऊ शकले नाही व त्यामुळे खर्च करता आला नाही. त्यामुळे राकावियो रुग्णालयांच्या डागडुजीवर खर्च करता आला नाही.

(२) हे अशत: खरे आहे.

मा.केंद्रीय राज्यमंत्री (श्रम व रोजगार) यांनी डिसेंबर, २०१४ मध्ये दिलेल्या मुंबई भेटीच्या वेळेस पत्रकार परिषदेत राकावि योजना राज्य शासनाने चालवावी असे जाहिर केले आहे. तथापि या संदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप लेखी सुचना प्राप्त झालेली नाही.

मात्र "राज्य कामगार अधिनियम (सुधारीत) २०१०" मध्ये विहित तरतूदी विचारात घेऊन मा.राज्य मंत्रिमंडळाने राज्यस्तरीय राकावि महामंडळ स्थापित करण्याबाबत निर्णय घेतला आहे. सदर महामंडळ स्थापित झाल्यानंतर त्यांच्यामार्फत राकावियो रुग्णालये चालविण्यात येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील चौकांचे नामकरणाबाबत

**(३१) २२१४९ (२३-०८-२०१६). ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चौकांचे नामकरण करण्याची विशिष्ट प्रक्रिया महानगरपालिकेने ठरवून दिली असून एकाच थोर व्यक्तीचे नाव वेगवेगळया चौकांना दिले जात असल्यामुळे नागरिक संभ्रमात पडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकांचे नामकरण करण्यापूर्वी नव्या नावाखाली जुने नाव लिहिण्याबाबत महानगरपालिकेने नियम करुन त्यांचे पालन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१७) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १३ एप्रिल, २०१० च्या ठराव क्रमांक ४४ नुसार, आख्यायिकेत प्रसिध्द असलेल्या ऐतिहासिक आणि ख्यातनाम व्यक्तींचा अपवाद वगळता एकापेक्षा अधिक रस्ते किंवा चौक यांना एकाच व्यक्तींचे नाव देता येत नाही. मुंबई शहर, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरातील रस्ते किंवा चौकांपैकी एका चौकास स्वतंत्रपणे त्यांची नावे देता येतात.

(२) सदर ठराव क्रमांक ४४ मधील निकषांनुसार विद्यमान रस्त्यांना / चौकांना देण्यात आलेली भारतीय व्यक्तींची नावे अपवादात्मक परिस्थिती खेरीज बदलण्यात येत नाहीत. नगररचना

योजना, सुधार योजना या अंतर्गत क्रमांक देण्यात आलेल्या रस्त्यांना नावे देण्यात येऊ शकतात. परंतु उक्त योजनेंतर्गत अगोदरच देण्यात आलेले क्रमांक संबंधित रस्त्यांच्या नामफलकावर दर्शविणे अपेक्षित आहे. तथापि कोणत्याही विभागात पूर्वी नाव असलेल्या चौकांचे नव्याने नामकरण करण्यात आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील अंगणवाडयांना जागा देण्याबाबत**

**(३२) २३२१४ (२०-०८-२०१६). श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुरात एकूण ३३९४ अंगणवाडयांपैकी २४४२ अंगणवाडयांसाठी इमारत नसल्याने शाळेतील रिकाम्या खोल्यांमध्ये, ग्रामपंचायत इमारती, समाज मंदीर, भाडयाच्या खोल्या घेऊन अंगणवाडया सुरू आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील इमारती नसलेल्या २४४२ अंगणवाडयांना जागा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-१२-२०१६) :** (१) व (२) कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण ३३९४ अंगणवाड्यांपैकी २१९८ केंद्रांना स्वत:ची इमारत नाही.

अंगणवाडी इमारत बांधकामासाठी जिल्हा नियोजन विकास समितीकडून तरतूद उपलब्ध होत असून सदर तरतूदीतून अंगणवाडी इमारत बांधकामे पूर्ण केली जातात. सन २०१५-१६ मध्ये जिल्हा नियोजन विकास समितीकडून १८७ अंगणवाडी इमारत बांधकामांना निधी मंजूर झाला असून सदरची कामे मार्च, २०१७ पर्यंत पूर्ण होणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी योजनांतील गैरव्यवहाराच्या चौकशी अहवालास विलंब झाल्याबाबत**

**(३३) २३५८८ (१६-१२-२०१६). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी समाजाच्या विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांमधील गैरव्यवहाराची चौकशी करणाऱ्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील समितीवर मागील दोन वर्षात रुपये ३ कोटींहून अधिक खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीला ६ महिन्यांच्या आत अहवाल सादर करणे बंधनकारक असतानाही मागील दोन वर्षात ५ वेळा मुदतवाढ दिली असून आता पुन्हा ६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०२-२०१७) :** (१) नाही. हे खरे नाही. सदर समितीवर माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर रुपये १,९३,५७,३३३/- इतका खर्च झालेला आहे.

(२) होय, हे खरे आहे. चौकशी समितीला या प्रकरणातील सर्व व्यक्ती/दावेदार यांना समन्स काढून त्यांच्या साक्षी नोंदविणे, उलट तपासणी घेणे, इत्यादी कामाकरिता तसेच जनहित याचिका क्र.१५३/२०१२ मध्ये याचिकाकर्त्याने केलेल्या प्रत्येक आरोपांची शहानिशा करण्याकरिता प्रत्यक्ष स्थळ/ कार्यालये यांची पाहणी करुन वस्तुस्थिती जाणून घ्यावी लागत असल्यामुळे या सर्व कामकाजासाठी विहीत कालावधी पर्याप्त नसल्याने वारंवार मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २६/९/२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे दिनांक १७/७/२०१६ च्या पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरिता सदर कालावधीनंतर यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नाही या अटीवर अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सध्या चौकशी समितीचे कामकाज अंतिम टप्प्यात असून, समितीने सदर अहवाल शासनास सादर केल्यानंतर अहवालानुसार सुचविलेल्या शिफारशी विचारात घेवून न्यायालयाच्या निर्णयानुसार शासन स्तरावरुन पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक तालुका व जिल्हा हद्दीतील काही गावांतील शेत जमिनींवर असलेल्या देवस्थान संस्थानाच्या नोंदी कमी करणेबाबत**

**(३४) २३७८९ (३०-१२-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक १ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक ५२७९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील देवस्थान जमिनीच्या संदर्भात तत्कालिन राज्यमंत्री (महसुल) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन समितीचा अहवाल शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक तालुका व जिल्हा हद्दीतील तसेच, राज्यात विविध गावांमधील शेत जमिनीवर ब्रिटीश कालावधीपासून देवस्थानाच्या नोंदी असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या गरजा भागविणे कठीण होत असल्याने देवस्थान संस्थानाच्या नोंदी कमी करण्याबाबतच्या अहवालास शासनाने मान्यता प्रदान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शेत जमिनीवर असलेल्या देवस्थान संस्थानाच्या नोंदी कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०२-२०१७) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील देवस्थान जमिनीच्या संदर्भात तत्कालिन राज्यमंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असून, सदर अहवाल शासन स्तरावर विचाराधीन आहे. दरम्यानच्या कालावधीत, राज्यातील देवस्थान जमिनी यांच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकरीता याबाबत सर्वंकष अभ्यास करुन शासनास योग्य शिफारशी करण्याकरीता

शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.१००/ज-१, दिनांक २३/३/२०१६ अन्वये प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यावर त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**राज्यात शासकीय नोकरीसाठी वयोमर्यादेत वाढ करण्याचा निर्णयाबाबत**

**(३५) २४४६७ (०४-०१-२०१७). श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक १४९८९ ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय नोकरीसाठी वयोमर्यादेत वाढ करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी केलेल्यांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१७) :** (१) होय, शासन सेवेतील प्रवेशासाठी, खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी असलेली ३३ वर्षे ही कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी वाढवून त्यांची कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी असलेली ३८ वर्षे ही कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी वाढवून त्यांची कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे करण्याबाबत दिनांक २५/०४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये आदेश दिलेले आहेत.

(२) व (३) नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी केलेल्यांसाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत असलेली कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्रे यांच्यामार्फत बेरोजगार उमेदवारांसाठी ग्रंथालय सदृश अभ्यासिका निर्माण करणे, रोजगार मेळावे आयोजित करणे, बेरोजगारांची सेवा सहकारी संस्था स्थापन करणे, आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र, सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्रामध्ये व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्राची स्थापना, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान या सारखे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

---

**रत्नागिरी जिल्ह्यात पुलांचा तांत्रिक सर्वेक्षण करणारे पूल तपासणी युनिट मागील तीन महिन्यांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे बंद अवस्थेत असल्याबाबत**

**(३६) २४९०३ (३०-१२-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व ब्रिटीशकालीन पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी केली परंतु रत्नागिरी जिल्ह्यात पुलांचा तांत्रिक सर्वेक्षण करणारे पूल तपासणी युनिट मागील तीन महिन्यांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे बंद अवस्थेत असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सर्वेक्षण करणारे पूल तपासणी युनिट व्हॅन नादुरुस्त व बंद अवस्थेत असण्याची कारणे काय होती,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरील नादुरुस्त युनिट व्हॅन सुरु करुन रत्नागिरी जिल्ह्यातील जुन्या पूलांचे ऑडिट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०२-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

२४ मे ते २३ जून, २०१६ या कालावधीमध्ये पूल पाहणी संयंत्राच्या सहाय्याने रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील एकूण २३ मोठ्या पुलांची सर्वकष पाहणी पूर्ण करण्यात आली. त्यानंतर पावसामुळे पुलांच्या पाहणीचे काम स्थगित करुन संयंत्र रत्नागिरी येथील विश्रामगृहाचे आवारात ठेवण्यात आले होते. त्यानंतर जुलै, २०१६ अखेर सदरील यंत्र नादुरुस्त झाल्याचे निदर्शनास आले.

(२) सदर फिरते पूल पाहणी सयंत्र सन १९८६ मध्ये खरेदी केलेले असून ब्रांटो स्कायलिप्ट या विदेशी बनावटीचे असून ३० वर्षापूर्वीचे जुने आहे. सदर सयंत्राच्या इंजिन व क्लच या मुख्य घटक यंत्रणेत बिघाड झाल्याने नादुरुस्त होवून सयंत्र बंद पडले होते.

(३) सदर संयंत्राचे इजिन तातडीने मुंबई येथे आणून व सर्व दुरुस्ती कामे दिनांक १८/०९/२०१६ रोजी पूर्ण करण्यात आल्यानंतर दिनांक ४/१/२०१७ अखरेपर्यंत रत्नागिरी जिल्ह्यातील २५ जुन्या पुलांचे ऑडिट करण्यात आले.

मात्र, ते सदर यंत्राच्या सहाय्याने करण्यात आले नाही. कारण सदर यंत्राच्या सहाय्याने दिनांक २१/९/२०१६ ते दिनांक १७/१०/२०१६ या कालावधीत राष्ट्रीय महामार्ग ८ वरील वर्सोवा खाडी पूल व शहापूर तालुक्यातील राज्यमार्गावरील काळू नदीवरील पुलांची तपासणी केलेली आहे.

---

**आर्णि (जि.यवतमाळ) तहसील कार्यालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३७) २५०८५ (१६-१२-२०१६). श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी तहसील कार्यालयामध्ये (जि.यवतमाळ) संजय गांधी, श्रावणबाळ निराधार इ.योजना राबविण्यात येणाऱ्या विभागातील पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रिक्त पदांमुळे महसुल कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०२-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र पुरस्कृत योजनांचा वाढता व्याप विचारात घेऊन विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गतच्या पदांचा सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती विभागातील अल्पसंख्याक विभागाची कामे जलदगतीने करण्याबाबत**

**(३८) २५०९१ (१६-१२-२०१६). श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाराव्या पंचवार्षिक योजनेतील केंद्रपुरस्कृत बहुक्षेत्रिय पंचवार्षिक योजनेतील कार्यक्रमांतर्गत अमरावती विभागातील अल्पसंख्याक विभागाची कामे करण्याचे आदेश शासनाने माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०२-२०१७) :** (१) व (२) होय. १२ व्या पंचवार्षिक योजनेत केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाने बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत (MSDP) राज्यातील अमरावती विभागातील बुलढाणा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यातील शैक्षणिक व आरोग्यविषयक विकासकामांना मान्यता दिली आहे. शासन ज्ञापन, दिनांक २३/०५/२०१६ व दिनांक ६/०६/२०१६ अन्वये MsDP अंतर्गत मान्यताप्राप्त अमरावती विभागातील बुलढाणा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यातील शैक्षणिक व आरोग्यविषयक विकास कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून, शासन निर्णय, दिनांक ३१/०३/२०१६ आणि दिनांक ३०/०४/२०१६ अन्वये MSDP अंतर्गत मान्यताप्राप्त विकास कामांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र + राज्य हिश्यातील पहिल्या टप्प्यातील निधी संबंधित जिल्हाधिकारी यांना मंजूर करुन वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरमागड (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथील आदिवासी**
**आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू**

**(३९) २५२५६ (१०-०१-२०१७). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरमागड (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथील आदिवासी विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील शिक्षक/अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे एका विद्यार्थ्यांचा आजाराने मृत्यू होणे व एकाची प्रकृती गंभीर असल्याने त्याला उपचारासाठी गडचिरोली येथे नेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अशा किती आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचे मृत्यू झाले आहेत, यास जबाबदार असणाऱ्या शिक्षक/अधिकारी, कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२५-०१-२०१७) :** (१) खरे आहे.

(२) व (३) शैक्षणिक वर्षे सन २०१३-१४ ते सन २०१५-१६ या कालावधीत राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये २७२ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे. विद्यार्थी मृत्यूच्या घटनांबाबत प्रकरण परत्वे जबाबदार दिसून आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे व येत आहे. शासकिय आश्रमशाळा येरमागड येथील प्रकरणी मुख्याध्यापक श्री.पी.एम.वानखेडे यांची एकस्तर वेतनश्रेणी बंद करण्यात आली आहे.

शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या कारणांचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक ३०/५/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री.सुभाष साळुंखे, सेवानिवृत्त आरोग्य संचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीने आपला अहवाल शासनास दिनांक १९/१०/२०१६ रोजी सदर केला आहे. सदर अहवालातील शिफारशींनुसार अंमलबजावणी सुरु आहे.

---

### राज्यात प्रशिक्षाणार्थी कालावधी पूर्ण केलेल्या शिक्षण सेवकांना नियमित करुन वेतन देण्याबाबत

**(४०) २५५६४ (१६-१२-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रशिक्षण कालावधी पूर्ण केलेल्या शिक्षण सेवकांना कायद्यानुसार नियमित करुन त्यांचे वेतन सुरु केले जातील असे आश्वासन शिक्षण आयुक्त यांनी एका संघटनेला दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्वासनाची पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शिक्षण संचालक, सहसंचालक, उपसंचालक, शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(४१) २५७७६ (१६-१२-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १९५४६ ला दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विभागातील शिक्षण संचालक, सहसंचालक, उपसंचालक, शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी या संवर्गातील २६४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या शिक्षण विभागामध्ये असलेली व्याप्ती पहाता, शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांची असलेली मोठी संख्या आणि कोट्यवधी विद्यार्थ्यांचे भवितव्य याबाबींचा विचार करता सदरील रिक्त पदे भरणेसंबंधीची कार्यवाही शासनाकडून करण्यांत आली आहे काय,

(३) नसल्यास, रिक्त पदांमुळे अनेक ठिकाणी अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आल्याने त्याचा कामकाजाच्या गतीवर होणारा परिणाम पाहता सदरील रिक्त पदे केव्हापर्यंत भरण्यात येणार आहे व त्यासाठी होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.
सद्यस्थितीत खालीलप्रमाणे पदे रिक्त आहेत.

शिक्षण संचालक व तत्सम-०१
शिक्षण सहसंचालक व तत्सम-०९
शिक्षण उपसंचालक व तत्सम-१८
शिक्षणाधिकारी व तत्सम-३३
उपशिक्षणाधिकारी व तत्सम-२०८

(२) वर नमूद सर्व संवर्गातील पदभरतीची प्रक्रिया सुरू आहे.
(३) विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांचे ५ वर्षाचे गोपनीय अहवाल प्राप्त करून घेणे, जात वैधता प्रमाणपत्र तपासणे, आरक्षण निश्चिती व बिंदुनामावलीस मान्यता घेणे, विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेऊन पात्रता ठरविणे, निवडसूचीस मान्यता घेणे, विभागीय संवर्ग मागविणे, नागरी सेवा मंडळाच्या बैठकीत विभागनिहाय पदस्थापना देऊन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेणे इत्यादी प्रक्रिया पार पाडणे आवश्यक असल्याने त्यामध्ये थोडा विलंब होत आहे.

---

## राज्यातील पात्र ठरलेल्या विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय आणि अनुदानित, विनाअनुदानित तुकड्या यांची यादी जाहिर करण्याबाबत

**(४२) २५८४२ (१६-१२-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पात्र ठरलेल्या विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय आणि अनुदानित, विनाअनुदानित तुकड्या यांची यादी शासनाने जाहिर करावी म्हणून कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय शाळा कृती समितीने आझाद मैदानात बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पात्र शाळा-महाविद्यालयांतील शिक्षकांना १०० टक्के अनुदान मिळत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका कृती समितीने घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१७) :** (१) व (२) होय.
(३) कनिष्ठ महाविद्यालयांच्या मुल्यांकनाबाबत क्षेत्रियस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुही (जि.नागपूर) तालुक्यात गोसंवर्धनासाठी जमा केलेल्या गाईच्या गोरक्षण ट्रस्टच्या गो शाळेत अनेक गाई मरणासन्न अवस्थेत असल्याबाबत

**(४३) २५९९६ (३०-१२-२०१६). श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुही (जि.नागपूर) तालुक्यात गोसंवर्धनासाठी जमा केलेल्या गाईच्या गोरक्षण ट्रस्टच्या गो शाळेत अनेक गाई मरणासन्न अवस्थेत आहेत तसेच यात मृत्यू झालेल्या गाईंना थेट तलावात फेकले जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गो शाळेतील गाई कसाईला विकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गोरक्षण ट्रस्ट चालविण्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१६-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यात कार्यरत असलेल्या गोरक्षण ट्रस्टच्या गोशाळेत अनेक गाई मरणासन्न अवस्थेत असलेबाबतचे वृत्त खाजगी वृत्तवाहिनीवरुन प्रसिध्द करण्यात आले होते. त्या अनुषंगाने प्रादेशिक सहआयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी केली असता सदर बातमीमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुदानासाठी पात्र शाळा व तुकड्यांचे मुल्यांकन करण्याबाबत

**(४४) २६०४३ (१६-१२-२०१६). श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानासाठी मुल्यांकनास पात्र असलेल्या शाळा व तुकड्यांचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या शासन आदेशानुसार प्रत्येक वर्षी मुल्यांकन करून घेणे क्रमप्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील शासन निर्णयानुसार मुल्यांकनाचा कालावधी झालेल्या शाळा व तुकडयांचे मुल्यांकनासाठी शासनस्तरावरून आदेश पारीत केले आहेत काय,

(३) नसल्यास, शासनाचे याबाबत पुढील धोरण काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२७-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय दिनांक १ जुलै, २०१६ व २ जुलै, २०१६ अन्वये शाळा व तुकड्या अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर व डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील वसई-उत्तन समुद्रात हद्दीवरून मासेमारी करण्याचा कायदा करण्याबाबत**

**(४५) २६०६८ (३०-१२-२०१६). श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर व डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील वसई-उत्तन मच्छिमारांमध्ये समुद्रात हद्दीवरुन असलेले वाद सन २००४ पासून सुरु असून त्यादरम्यान मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार केंद्र शासनाने सन २००७ मध्ये राज्य शासनाला कायदा करण्याचे निदेश निर्गमित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वाद मिटविण्यासाठी जिल्हाधिकारी, मत्स्यव्यवसाय आयुक्त व सर्व संबंधितांची माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये बैठक संपन्न झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०२-२०१७) :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे. आयुक्त मत्स्यव्यवसाय व संबंधितांची दिनांक ७/९/२०१६ रोजी बैठक संपन्न झाली.

(३) होय, समुद्रातील वादातील क्षेत्र हे केंद्र शासनाच्या अखत्यारीत येत असून, राज्याच्या जलधीक्षेत्रा (१२ सागरी मैल) पलिकडील असल्यामुळे विभागामार्फत कारवाई करण्याचा किंवा रोखण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मत्स्य संवर्धनाच्या केज कल्चर प्रणाली माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४६) २६३२१ (३०-१२-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मत्स्य संवर्धनाच्या केज कल्चर प्रणाली माध्यमातून सुमारे एक लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यात येणार असल्याचे मा.मत्स्य विकास मंत्र्यानी घोषणा केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केज कल्चरच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचा प्रमुख उद्देश असून यासाठी मत्स्य व्यवसाय धोरण व कार्य प्रणाली आखण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धोरणाची अंमलबजावणी कधीपर्यंत करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उक्त धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय ?

**श्री. महादेव जानकर (१५-०२-२०१७) :** (१) होय.
(२) होय.

राज्यातील मत्स्य उत्पादन वाढ करण्यासाठी पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करण्याबाबतचे धोरण व कार्यप्रणाली शासन निर्णय क्र. मत्स्यवि-२०१६/प्र.क्र.९८/पदुम-१३, दिनांक १७/१०/२०१६ अन्वये आखण्यात आली आहे.
(३) सदर धोरणाची अंमलबजावणी सुरु आहे.
(४) दिनांक १७/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करण्यासाठी २०० हेक्टर वरील जलाशयातील १ टक्के जलक्षेत्र पिंजरा पध्दतीने ठेक्याने देण्यासाठी, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन संबंधित संवर्धकाच्या ताब्यात देण्यात येणार आहे. अशा जलक्षेत्रात जास्तीत जास्त ६x४x४ फूट या आकाराचे ४८ केज बांधकामास परवानगी देण्यात आली आहे.

पिंजरा पध्दतीने देण्यात आलेल्या ठेक्याचा कालावधी ७ वर्षाचा राहील.

पिंजऱ्याचे बांधकाम १५०० चौ.मी इतके मर्यादित ठेवून त्यासाठी आकारण्यात येणारी न्युनतम ठेका रक्कम ही प्रथम वर्षी रुपये ५०,०००/- इतकी राहील.

---

### राज्यातील मच्छिमार बांधवांना राज्य शासनाच्या मत्स्यव्यवसाय अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या त्रासाबाबत

**(४७) २६४८० (३०-१२-२०१६). ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यातील मच्छिमार बांधवांना सागरी किनाऱ्यापासून समुद्रात १२ नोटीकल माईल पर्यंत मच्छिमार करण्यास केंद्र व राज्य शासनाकडून अटी व शर्तीनुसार मच्छिमार करण्यास परवानगी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाची परवानगी असतानाही सागरी हद्दीत (१२ नोटीकल माईल पर्यंत) मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांवर मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दंडात्मक कारवाई करण्यात येत असून मच्छिमार बांधवांना नाहक त्रास देण्यात येत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मच्छिमार बांधवांवर होणारी दंडात्मक कारवाई रोखण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत अवैध मासेमारी, पध्दती व विशिष्ट बंदी कालावधीत जलधी क्षेत्रात मासेमारी करणाऱ्या मासेमारी नौकांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे ४६९ देवस्थानामधील गैरव्यवहाराबाबत**

**(४८) २६५२२ (०४-०१-२०१७). श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे ४६९ मंदिरामध्ये भक्तांनी अर्पण केलेल्या सोन्या-चांदीचे दागिने व इतर मौल्यवान वस्तूंचा गैरव्यवहार झाला असल्याचे निरीक्षण लेखा परिक्षकांनी अहवालात नोंदविले असून देवस्थानमधील इतर गैरकारभारावरही आक्षेप घेतले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन देवस्थानांच्या संपत्तीचा अपहार करणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही. पश्चिम महाराष्ट्रातील ३०६७ मंदिरे देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांच्या नियंत्रणाखाली असून सर्वच देवस्थानाकडे सोन्या-चांदीचे दागिने नाहीत. ४३० गावांमधील देवस्थानास दागिने उपलब्ध झाले असून या दागिन्यांचे मुल्यांकन केलेले आहे. ज्यांच्या ताब्यात दागिने आहेत त्यांचा तपशिल व त्यांच्या पोहोच दप्तरी आहेत. बहुतांश दागिने हे पोलीस पाटील किंवा गावातील मानकरी यांच्याकडे असून देवस्थान उत्सवाच्या वेळी हे दागिने वापरल्यानंतर ते ज्यांच्या ताब्यात आहेत, त्यांच्याकडे परत केले जातात. अद्यापी कोणत्याही गावात दागिन्यांमध्ये अपहार झाला आहे किंवा दागिन्यांची चोरी झालेली आहे, अशी बाब उत्पन्न झालेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील दिघी व औरंगाबाद जिल्ह्यातील शेंद्रा या पंचतारांकित औद्योगिक वसाहती दरम्यान आठ पदरी महामार्ग करण्याबाबत**

**(४९) २८२३० (२५-०४-२०१२). श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळुन) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा विभागाच्या विकासाच्या दृष्टीने व औद्योगिकरणाला चालना देण्यासाठी रायगड जिल्ह्यातील दिघी व औरंगाबाद जिल्ह्यातील शेंद्रा या पंचतारांकित औद्योगिक वसाहती दरम्यान आठ पदरी महामार्ग करण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-१२-२०१६) :** (१) सदर योजना उद्योग विभागाच्या दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर प्रकल्पांतर्गत विचाराधीन आहे.
(२) दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर प्रकल्पांतर्गत दिघी, म्हसळा, माणगांव, विळे, ताम्हणीघाट ते रायगड जिल्हाहद्द (रा.मा.६०) रस्ता आणि खालापूर, पाली, रोहा, आंगरदांडा रस्ता (रा.मा.९२) या रस्त्याचे आठ पदरी करण्याचे काम शासन स्तरावर विचाराधीन आहे. तथापी औरंगाबाद जिल्ह्यातील शेंद्रा या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीस जोडणाऱ्या रस्ता आठ पदरी करण्याचा कोणताही प्रस्ताव सा.बां. विभागाकडे सध्या नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना दिला जाणारा प्रोत्साहन भत्ता सहाव्या वेतन आयोगानुसार देण्याबाबत**

**(५०) ४१८८० (२८-०८-२०१३). डॉ.अपूर्व हिरे : दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक अकरावी मधील प्रश्न क्रमांक ३४१२२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना दिला जाणारा प्रोत्साहन भत्ता सुधारित सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे व १५% दराने देण्यात यावा व त्याची कमाल मर्यादा ६०००/- रुपये इतकी करावी, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१२ चे निवेदनाद्वारे मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, सदरहू निर्णय केव्हापर्यंत घेण्यात येईल ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०१-२०१७) :** (१) सदर निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.
सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६ ऑगस्ट, २००२ अन्वये नक्षलग्रस्त/अतिसंवेदनशील आदिवासी भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मुळ वेतनाच्या १५ टक्के इतका किमान रुपये २०० व कमाल रुपये १५००/- दरमहा या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.